**विशेष लेख क्र.१९९**

२३ ज्येष्ठ १९२८ शके (सायं.५.३०वा.)
मंगळवार, दि. १३ जून, २००६

# वस्त्रोद्योगातील रोजगारात राज्याची आघाडी

वस्त्रोद्योग क्षेत्रातील रोजगार निर्मितीत राज्य आघाडीवर असल्याचे वस्त्र मंत्रालयाच्या २००५-०६ च्या वार्षिक अहवालात म्हटले आहे. त्यात सातत्याने रोजगारांची नवीन भर पडत असल्याने हा विभाग रोजगार निर्मितीत सिंहाचा वाटा उचलणारा विभाग होईल यात शंका नाही.

महाराष्ट्राच्या आघाडीनंतर तामीळनाडू आणि गुजरात ही राज्ये या रोजगारात दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर आहेत. ठिकठिकाणावरील उद्योग अडचणीत येत असतांना वस्त्र निर्मिती उद्योग हा या सर्वावर मात करुन उभारी घेत असल्याचे यावरुन दिसून येत आहे. म्हणून वस्त्रोद्योग हा किती महत्त्वाचा उद्योग आहे यावरुन स्पष्ट होते.

अन्न, वस्त्र व निवारा या मानवाच्या प्रमुख गरजा असून १०० कोटींच्यावर लोकसंख्या असलेल्या भारत देशात वस्त्रोद्योगाचे महत्त्व कायम टिकून आहे. जानेवारी २००५ पासून आंतरराष्ट्रीय वस्त्रोद्योग व्यापार पेठ (डब्ल्यूटीओ) सर्व प्रकारची कोटा प्रणाली नियंत्रणे खुली करण्यात आल्याने भारतातील वस्त्रोद्योगात नवी दिशा मिळाली आहे. सद्य:स्थितीत वस्त्रोद्योगातील १५ बिलियन अमेरिकन डॉलर एवढी भारतातून निर्यात होत आहे. ती पुढील ५ ते १० वर्षात ५० बिलियन डॉलरपर्यंत वाढेल, असा या क्षेत्रातील तज्ज्ञांनी हवाला दिला आहे. युरोपियन बाजारपेठेमध्ये चीननंतर भारताला या क्षेत्रात सिंहाचा वाटा मिळणार असल्याचे निर्यातदारांचे म्हणणे आहे.

याचे मुख्य कारण म्हणजे आपल्या देशात कॉटन, पॉलिस्टर, विस्कोज, फिलामेंट यार्न यासारखा कच्चा माल मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. त्याशिवाय सूत गिरण्यांच्या मशिनरी पुरवठाधारक कंपन्या, शैक्षणिक व संशोधन संस्था, प्रशिक्षित व कुशल कामगार, प्रगत संगणकीय माहिती तंत्रज्ञान याची उत्तम जोड या धंद्यासाठी तयार आहे. पण यातील काही उणीवाही स्पष्ट आहेत. आपल्याकडे कापड उत्पादक क्षमता तांत्रिकदृष्ट्या सक्षम नाही. जुन्या यंत्रसामुग्रीवर समाधान मानणा-यांचे प्रमाण मोठे आहे. आजही देशात कापडाचे ७० टक्के उत्पादन हे डिसेंट्रलाईज्ड पॉवरलूम क्षेत्रामध्ये बनविले जात असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे कितीही मोठे कष्ट उपसले तरी त्यातून फार काही निष्पन्न होत नाही.

यासाठी भारत सरकारने देशात ५ लाख शटललेस लूम्स बसविण्याचे धोरण आखले आहे. प्रोसेसिंग युनिटच्या आधुनिकतेसाठी ८ टक्के टफ सबसिडी व २० टक्के कॅपिटल सबसिडी जाहीर केली आहे. त्यासाठी निटींग व रेडीमेड गारमेंट इंडस्ट्रीज जोडण्याची आवश्यकता आहे. राज्यात काही ठिकाणी असे उद्योग एका साखळीत उभारण्याचे प्रयत्न सुरु झाले आहेत. त्यात काही खाजगी उद्योगांनीही आपला वाटा वाढविला असल्याचे दिसून येत आहे. जागतिक स्पर्धेला प्रभावीपणे सामोरे जाण्यासाठी उत्कृष्ट दर्जा, किफायतशीर किंमत, ग्राहकाचे समाधान, वेळेची शिस्तप्रिय डिलीव्हरी हे सूत्र या धंद्यात अवलंबविणे आवश्यक आहे. यासाठी या उद्योगात मॅनेजमेंटच्या माध्यमातून सुधारणा कराव्या लागणार आहेत.

..२

**राज्यात वाढता सहभाग**

देशातील एकूण स्थापित क्षमतेपैकी १० टक्के चात्या या सहकारी क्षेत्रात असून यातील ३५ टक्के चात्या एकटया महाराष्ट्रात कार्यान्वित आहेत. सहकारी क्षेत्रातील ८० गिरण्यांपैकी ५२ गिरण्या कार्यरत असून त्यांच्या चात्यांची क्षमता १५.६९ लाखात तर रोटर्सची संख्या ८८६४ आहे. याशिवाय ३६ गिरण्या उभारणीच्या विविध स्तरावर आहेत. हातमाग व यंत्रमाग अनुक्रमे ४४,७२४ आणि ९,२५,३४१ एवढया संख्येने आहेत. राज्याचा वस्त्रोद्योग दरवर्षी सुमारे १००० कोटीच्या वार्षिक उलाढालीतून ११०० लाख किलो सूताची निर्मिती करीत आहे. त्यातून ११० कोटी रुपये विविध कराच्या रुपाने केंद्र आणि राज्य सरकारांना मिळवून देण्याचे काम होत असते.

महाराष्ट्र शासनाने, ग्रामीण भागांचा विकास, रोजगार निर्मिती कापूस उत्पादक आणि विणकरांना लाभ मिळवून देणे ही उद्दीष्टे समोर ठेऊन या उद्योग धंद्याला भागभांडवलाच्या स्वरुपात मदत दिली आहे. मात्र आता जागतिकीकरणाच्या स्पर्धेमुळे परिस्थिती बदलत असल्याने या उद्योगाने केवळ राज्य शासनाच्या मदतीवर अवलंबून न राहता स्वतःहून पुढाकार घेऊन आपल्या व्यवसायात स्वयंपूर्तता गाठण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

राज्य शासनाच्या मदतीमुळे आणि डब्ल्यूटीवो करारामुळे आज वस्त्रोद्योग मंदीच्या लाटेतून बाहेर पडत असून कृषी क्षेत्राखालोखाल रोजगारांच्या संधी आज वस्त्रोद्योगात मोठया प्रमाणावर उपलब्ध आहेत. साखर उद्योगाप्रमाणे या उद्योगात मर्यादा आली नसल्यामुळे वस्त्रोद्योगाच्या वाढीस भरपूर वाव आहे. त्यामुळे भविष्यात वस्त्रोद्योगात मोठया प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

राज्यातील वस्त्रोद्योगाला आधुनिकतेची जोड देऊन सर्व पॉवरलूम्स् शटललेस केल्यास तसेच निटिंग व रेडीमेट गारमेंट इंडस्ट्री एका साखळीत उभारल्यास आणि त्यावर उत्तम व्यवस्थापन ठेवल्यास या उद्योगातून अजूनही मोठया प्रमाणावर रोजगार निर्मिती होणे शक्य आहे. वाढत्या बेरोजगारीवर हा रामबाण उपाय ठरु शकेल, असा विश्वास आहे.

**- - डी.आर. गाडे**

- - - - -